विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

राज्यशास्त्र विभाग

अंतर्गत मूल्यमापन सूचना

दि. १४/०२/२०२०

बीए भाग २, सेमिस्टर ४ च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनीना सूचित करण्यात येते की पेपर क्र. ५ "महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया" या पेपरच्या अंतर्गत मूल्यामापानासाठी पुढील प्रश्नाचे उत्तर लिहावे व दि. ०५ मार्च २०२० पूर्वी कु. समीक्षा फराकटे यांच्याकडे जमा करावे.

खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सखोल व सविस्तर विवेचन करा. शब्दमर्यादा: ३००० शब्द गुण: १०

अ) महाराष्ट्राततील दलित चळवळीचे टीकात्मक परिक्षण करा.

ब) महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या कार्याचे टीकात्मक परिक्षण करा.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

(प्रा. डी. ए. पवार )

Head
विभागप्रमुख
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE
KOLHAPUR (AUTONOMOUS)

विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर (स्वायत्त )

राज्यशास्त्र विभाग

सूचना

दिनांक-7/8/2020

---

महाविद्यालयातील बी.ए.भाग -३ च्या राज्यशास्त्र विषयाच्या सर्व विध्यार्थी-विध्यार्थीनीना सूचित करण्यात येत की, दिनांक 10 /08 /2020 पर्यंत सेमिस्टर 05 पेपर नंबर - 08 ( लोकप्रशासन ) ची होम असायमेंट लिहून गूगल क्लासरूमला पाठवावी.

प्रश्न - लोक प्रशासन म्हणजे काय? लोकप्रशासनाचे व्याप्ती स्पष्ट करा.

(प्रा. डी.ए. पवार)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

Head
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE
KOLHAPUR (AUTONOMOUS)

**VIVEKANAND COLLEGE (AUTONOMOUS), KOLHAPUR**
**B.A.-II (Sem - III) Roll Call For the Year : 2020 - 21**
## Political Science
Paper No - IV

| Sr. N | Roll N | Name of th Students | Assignment | | | Signature |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5018 | * BHORE DIPTI HARIDAS | 09 | | | [signature] |
| 2 | 5020 | * BHORE SANJEEVANI PRAKASH | 09 | | | [signature] |
| 3 | 5023 | * BHOSALE RUTUJA TANAJI | 09 | | | [signature] |
| 4 | 5025 | BUDAKE GURUPRASAD SHIVAJI | 09 | | | [signature] |
| 5 | 5028 | CHAVAN GANESH MAHADEV | 09 | | | [signature] |
| 6 | 5030 | * CHAVAN PUSHPAK SANJAY | 09 | | | [signature] |
| 7 | 5031 | * CHAVAN SWATI AJIT | 10 | | | S.A. Chavan |
| 8 | 5034 | * CHOUGULE PRATIKSHA RAVSAHEB | 10 | | | [signature] |
| 9 | 5036 | * DABHOLKAR PRATIK VIJAY | 10 | | | [signature] |
| 10 | 5040 | DHAKAVE VISHAL BAPUSO | 10 | | | [signature] |
| 11 | 5042 | * DHAVAN RUPALI BABURAO | 10 | | | [signature] |
| 12 | 5045 | * FASE PRATIK BALASAHEB | 09 | | | Pratik |
| 13 | 5046 | GABHALE PRAVIN PRAKASH | — | | | |
| 14 | 5050 | GAVALI ANIRUDDHA VASANT | 08 | | | [signature] |
| 15 | 5058 | GOTE HARDIK SANDESH | 08 | | | [signature] |
| 16 | 5060 | * GURAV GANPATI KRUSHNAT | 10 | | | [signature] |
| 17 | 5069 | * INGALE PIYUSH MOHAN | 09 | | | [signature] |
| 18 | 5073 | * JADHAV SHARVARI SHASHIKANT | 10 | | | [signature] |
| 19 | 5076 | * JAGDALE ANJALI SANJAY | 10 | | | [signature] |
| 20 | 5080 | JAMBHALE ROHIT DATTATRAY | | | | [signature] |
| 21 | 5086 | * KAMBLE NITIN DINKAR | 10 | | | [signature] |
| 22 | 5088 | KAMBLE AKASH RAJU | 08 | | | [signature] |
| 23 | 5091 | * KAMBLE NAVIN SARDAR | 10 | | | [signature] |
| 24 | 5097 | * KAMBLE SNEHAL BALASO | 09 | | | [signature] |
| 25 | 5102 | * KAMBLE YASHPAL RAJAN | 09 | | | [signature] |
| 26 | 5107 | KATTE LAKHAN KASHINATH | 10 | | | For L.K.K |
| 27 | 5111 | KHILLARE RAKESH MUKAND | 09 | | | [signature] |
| 28 | 5113 | KHONDRE GANESH AJIT | 09 | | | [signature] |
| 29 | 5115 | * KHOT AJAY EKNATH | 09 | | | [signature] |
| 30 | 5118 | KHUDE VISHWAVIJAY MAHADEV | 10 | | | [signature] |

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | 5121 | * KOLI RUPALI HAMBIRRAO | — | | | |
| 32 | 5122 | * KOLI TEJASWINI ANANDA | 10 | | | |
| 33 | 5123 | * KOLI YOGITA ALOK | 10 | | | |
| 34 | 5125 | * LADE RAJ GHANSHYAM | 09 | | | |
| 35 | 5128 | * LOHAR VIJAY JAGANNATH | 10 | | | |
| 36 | 5130 | LOKHANDE NANDPREM AJIT | — | | | |
| 37 | 5135 | MALI ONKAR ASHOK | 09 | | | online |
| 38 | 5139 | * MANE KARTIKA ANIL | 10 | | | |
| 39 | 5140 | * MANE KETAN ANAND | 07 | | | |
| 40 | 5146 | * MBHAR SNEHAL SHRIKANT | — | | | |
| 41 | 5148 | * MHOLE SAYOJITA PRAKASH | 10 | | | |
| 42 | 5154 | MORE ROHAN SANJAY | 09 | | | |
| 43 | 5157 | * MUJAWAR AADIL ASLAM | 08 | | | |
| 44 | 5165 | NAIK PRUTHVIRAJ MANOJ | | | | |
| 45 | 5166 | * NAIK RAHUL NARAYAN | 10 | | | |
| 46 | 5168 | * NAWALE MAYURI DHONDIRAM | 09 | | | |
| 47 | 5170 | * NIGADE HEMANT BABAN | 10 | | | |
| 48 | 5177 | * PATIL ARPITA AMAR | 10 | | | |
| 49 | 5181 | * PATIL NIKITA PRASHANT | 09 | | | |
| 50 | 5190 | PATIL RUTVIK DHANAJI | 09 | | | |
| 51 | 5197 | * PATLE MAHESH RAJENDRA | — | | | |
| 52 | 5198 | * PATOLE RUTUJA BABURAO | 10 | | | |
| 53 | 5201 | * PAWAR POOJA ARJUN | 10 | | | |
| 54 | 5202 | * PAWAR SHITAL HARIDAS | 10 | | | |
| 55 | 5204 | PAWAR SOURABH SANJAY | — 06 | | | |
| 56 | 5205 | * PAWAR SUMIT SANJAY | 08 | | | |
| 57 | 5206 | * POWAR AKANKASHA KRUSHNAT | 09 | | | |
| 58 | 5208 | POWAR PRATHAMESH SANJAY | 09 | | | |
| 59 | 5209 | * POWAR RUTUJA RAVINDRA | 10 | | | |
| 60 | 5210 | * POWAR SAISHWARI MADHUKAR | 10 | | | |
| 61 | 5211 | * POWAR SNEHAL BHIVAJI | 10 | | | |
| 62 | 5218 | SAKATE ANIKET SHANKAR | 10 | | | |
| 63 | 5220 | SALE ABHISHEK SUDHIR*MAR | — | | | |
| 64 | 5222 | * SALOKHE SHUBHAM BHARAT | 10 | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 65 | 5225 | * SANGAR SARVESH SUBHASH | 08 | | | [signature] |
| 66 | 5226 | * SASANE KIRAN LAXMAN | — | | | |
| 67 | 5230 | * SATARDEKAR ADITYA SAJJAN | 09 | | | A.S.S |
| 68 | 5232 | SATPUTE PRATIK UMAJI | 08 | | | [signature] |
| 69 | 5235 | SAWANT TEJAS CHANDRAKANT | 10 | | | [signature] |
| 70 | 5244 | * SUBHEDAR MANDIR KRISHNAT | | | | |
| 71 | 5246 | * SURYAWANSHI PRIYANKA SHIVAJI | 10 | | | [signature] |
| 72 | 5249 | * SUTAR PALLAVI BHAGVAN | 10 | | | P.B.S |
| 73 | 5250 | * SUTAR PRIYANKA NARAYAN | 10 | | | [signature] |
| 74 | 5251 | * SUTAR SANKET KRUSHNAT | 09 | | | SKSutar |
| 75 | 5252 | SUTAR SUMIT ASHOK | 09 | | | [signature] |
| 76 | 5262 | * VADDR PRIYANKA SARJERAV | 10 | | | [signature] |
| 77 | 5267 | ZENDE SIDHARTH SUKHADEV | 09 | | | [signature] |
| 78 | 5268 | * ADSUL UTKARSHA SANJAY | — | | | |
| 79 | 5269 | GURAV SIDDHARTH TANAJI | — | | | |
| 80 | 5270 | * KAMBLE AISHWARYA BAJIRAO | — | | | |
| 81 | 5271 | * KAMBLE SEEMA BALU | — | | | |
| 82 | 5272 | * MALI RUPALI DATTATRAY | — | | | |
| 83 | 5273 | SAYYAD NADEEM SHAKIL | | | | [signature] |
| 84 | 5274 | TIPUGADE OMKAR ASHOK | — | | | |
| 85. | 5013 | Benade Kranti Anil | 10 | | | [signature] |
| | | Mr. D. A. Pawar | | | | |
| | | HoD | | | | |
| | | | | | | |

86) 5275 Snehal Shrikant kumbhar 10 [signature]

✓ 5088 AKASH RAJU Kamble [signature]

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

PAGE:
DATE: / /

# विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त)

## अंतर्गत मूल्यमापन परिक्षा 2020-21

होम असायमेंट सेमिस्टर - ३
विषय - राज्यशास्त्र बी.ए. भाग - 2
पेपर क्रमांक - 04 (भारतीय राजकीय विचारवंत भाग 1)
विद्यार्थीचे नाव - स्वाती अजित चव्हाण
रोल नंबर - 5031 दिनांक - 25/01/2021

10/10

प्र. 1 महात्मा जोतिबा फुले यांची बळीराज्य संकल्पना स्पष्ट करा.

**प्रस्तावना** -

भारत देश हा विकसनशील आणि कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. परंतु आजही भारतीय शेती आणि शेतकरी यांची स्थिती दयनीय आहे. इतिहासकालीन परिस्थितीचा विचार केला तर सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून शेतकऱ्याच्या सुधारणा संबंधीच्या उपाययोजनांची सुरुवात झाली आहे. परंतु आजही एकविसाव्या शतकात पदार्पण केल्यानंतरही ही स्थिती वेगळी नाही. अनेक समाजसुधारकांनी शेती व शेतकरी यांची वास्तव परिस्थिती मांडली. त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुलेंनीही शेतकऱ्याच्या उन्नतीसाही अनेक प्रयत्न केले.

**महात्मा जोतिराव फुले** -

भारतातील शेतकऱ्यांची अवनीती दारिद्र, शोषण या घटकांचा समावेश असणारे सर्वसमावेशक असे 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक 18 जुलै 1883 मध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी पूर्ण केले. यामध्ये त्यांनी भारतातील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दुरावस्थेचे चित्रण स्पष्टपणे केले आहे. भारतातील मध्यम व कनिष्ठ प्रतिच्या शुद्र शेतकऱ्यांच्या दैन्यव्यवस्थेला आणि समस्यांचे वर्णन करून गव्हर्नर जनरलमार्फत ब्रिटिश सरकारला त्याची यथोचित माहिती पुरवणे पर्यंतचे अनमोल कार्य फुलेंनी केले.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

महात्मा फुलेंची 'बळीराज्य' संकल्पना -

प्रत्येक गावामध्ये छोटे-छोटे शेतकरी असतात. त्यावेळी शेतकऱ्यांचे अतिशय हाल होत त्यांची केविलवाणी स्थिती जोतिरावांना पाहवत नव्हती. ऊन, पाऊस, थंडी, वारा याची तमा न बाळगता रात्रंदिवस शेतात काम करतो. तेव्हा शेत पिकते या पिकावर केवळ समाजच नव्हे तर देशातील सर्व लोकांचे जीवन अवलंबून असते. यासाठी शेतीच्या कामाला उत्तेजन देणे हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. 'शेतकरी सुखी तर देश सुखी' असे त्यांनी सर्वांना पटवून दिले.

शेतकऱ्यांची परिस्थिती, गरिबी नष्ट झाल्याशिवाय देशाची सुधारणा होणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणूनच त्यांनी दुष्काळाच्या वेळी शेतकऱ्यांची चळवळ हाती घेतली आणि अशी असंख्य कार्ये पार पाडली आणि त्यांनी शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्याचा अधिकाधिक प्रयत्न केला. यासाठीच्या सुधारणा आणि 'बळीराज्य संकल्पनेची स्पष्टता' पुढीलप्रमाणे.

**शेती सुधारणेचे उपाय**

अ) पाणीपुरवठा -

शेतीसुधारणेमध्ये त्यांनी पाणी पुरवठ्याला अग्रक्रम दिला. डोंगरावरील पानाफुलांचे, कृमिकिटकांचे व मांसा-हारांचे सत्त्व पावसाने पुराच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून लष्कर व पोलिस खात्यातील शिपायांकडून सरकारने जागोजागी बंधारे बांधून घ्यावेत. लहान मोठी धरणे बांधावी. प्रत्येक गावातील शेतांची पाहण्याकडून पाहणी करून जेथे पाण्या-चे झरे सापडतील त्या सर्व जागांच्या खुणा त्या-त्या गावाच्या नकाशावर नमूद करून सरकारच्या मदतीशिवाय पाण्याचा मार्ग दाखवणाऱ्या पाणाड्यासह विहिर खोदणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसे देण्याचा उपक्रम सरकारने सुरू करावा. नदीनाले व तलावातील साचलेला गाळ शेतकऱ्यांना नेऊन द्यावा.

ब) गोरक्षण -

पाणीपुरवठ्याप्रमाणे जनावरांच्या पैदाशीचा प्रश्नही त्यांनी विचारात घेतला. गोरक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR-416003

सन 1877-78 च्या दुष्काळात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुरांची हानी झाली होती. म्हणून येथिल शेतकऱ्यांना नविन शास्त्रविद्येचे ज्ञान देऊन यंत्राद्वारे शेतीची कामे करण्याइतपत समज येईपर्यंत गोहत्येला कायद्याने बंदी करावी. इंग्रज व मुसलमानांनी शेळ्या-बकऱ्याचे मांस खावे. शेळ्यामेंढ्यांच्या लेंड्यापासून होणाऱ्या खताचा पुरवठा व्हावा म्हणून शासनाने इतर देशातील नाना प्रकारच्या उत्तमोत्तम मेंढ्यांची खरेदी करून पैदास करावी. यातून शेतकऱ्यास फायदा होईल.

४) पीक संरक्षणासाठी बंदुकांची परवानगी -

पीकाच्या संरक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदुका जवळ बाळगण्यास सरकार परवानगी देत नाही. त्यामूळे रानडुक्कर जनावरे मारण्याची जबाबदारी सरकारने पोलिस खात्यावर टाकावी. जनावरांमूळे शेतीचे नुकसान झाल्यास ते पोलिस खात्यातील वरिष्ठ अंमलदाराच्या पगारातून कापून त्याची भरपाई करावी किंवा सरकारी तिजोरीतून ते देण्यात यावे.

५) शेतकऱ्यांना गुणवत्तेनुसार बक्षिसे व पदव्या -

शासनाने दरवर्षी प्रदर्शने भरवावी. शेतीकामाच्या परिक्षा घेऊन त्यात जे नैपुण्य दाखवतील त्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार बक्षिसे व पदव्या द्याव्यात. शेतकऱ्यांच्या मुलांनी शेती व तदनुषंगिक व्यवसायात लक्ष घातल्यावर त्यात त्याची कल्पकता व कार्यक्षमता दिसून आल्यास त्यांना सरकारी खर्चाने विलायतेतील शेती शाळा पाहण्यासाठी पाठवावे.

६) शेतकऱ्यावरील कराचा बोजा कमी करणे -

शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सावकाराला पर्याय म्हणून स्वतंत्र शेतकरी बँका काढण्याची कल्पना पुढे आली. पण शेतीचा धंदा किफायतशीर होत नाही तोपर्यंत या बँका यशस्वी होणार नाहीत असे. जोतिरावांचे मत होते. शेतीचा धंदा फायदेशीर व्हायचा असेल तर प्रथम त्यांच्यावरील कराचा बोजा कमी केला पाहिजे यासाठी शासनाच्या अवाढव्य खर्चाला कात्री लावण्याचा मार्ग त्यांनी सुचवला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD. JUNE 1964

ई) शेतकऱ्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगणारे समाजचिंतक-

महात्मा फुले हे शेतकऱ्यांची गाऱ्हाणी परखडपणे वेशीवर टांगणारे महाराष्ट्रातील पहिले समाजचिंतक होते. त्यांनी आपले विचार शास्त्रीय पद्धतीने मांडलेले नाही. त्यांच्या विवेचनात ओबडधोबड पणा होता. पण त्यांनी जातीय व वर्गीय संबंधातून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या अनिर्बंध शोषणाचे प्रथम आकलन झाले. त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समरसतेने समजून घेतले. त्यांची सर्वांगीण चिकित्सा केली आणि या कष्टकरी वर्गाची कैफियत गव्हर्नर जनरल व वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे सडेतोडपणे सादर करण्यासाठी तत्परता व जे धैर्य दाखवले त्यातच त्यांच्या लोकाभिमुखेचे रहस्य साठवलेले आहे.

फ) शेतकऱ्यांची उन्नती-

त्यांनी सावकाराच्या कचाट्यातून शेतकऱ्यांची सुटका करण्याचा प्रयत्न केला. सरकारने शेतकऱ्यांना कर्ज, जलसिंचन सुविधा, बी-बियाणे अशा सुविधा पुरवण्यात म्हणून फुलेंनी शेतकऱ्यांना मदत केली. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून सुद्धा त्यांनी प्रयत्न केले.

स) दुष्काळग्रस्तांना मदत-

1877 मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे अनेकांनी आपली खेडी सोडली. खेडी सोडताना अनेक लोकांनी आपल्या मुलांना मागे खेड्यातच ठेवले. अशा अनाथ मुलांसाठी फुलेंनी 17 मे 1877 रोजी 'व्हिक्टोरिया अनाथालय' सुरु केले. या मुलांचे पालक येईपर्यंत त्यांना अन्न - निवारा पुरवला.

माझ्या मते, समाजसुधारक, सत्यशोधक जोतिराव फुले यांचे शेतिविषयकचे हे सर्व उपाय शेतीच्या सुधारणेसाठी उपयुक्त आहेत. अशा प्रकारे ही संकल्पना स्पष्ट होते. अजुनही या उपाययोजनांची आपण प्रत्यक्ष अंमल-बजावणी केली तर फुलेंची 'बळीराज्य' ही संकल्पना सत्यात उतरेल.

★★★

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
राज्यशास्त्र विभाग

10/10

पेपर क्र. ९ : 'आंतरराष्ट्रीय राजकारण'
नाव : कु. प्रिया पांडुरंग बुगण
रोल नं : 5593
विषय : आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आदर्शवादी दृष्टिकोन

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास अनेक विचारवंतांनी विविध दृष्टिकोनांतून करून आंतरराष्ट्रीय राजकारणाबाबत नवनवीन सिद्धांत मांडले आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपाकडे बघण्याची भूमिका म्हणजे दृष्टीकोन होय. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाबाबत राजकीय आदर्शवाद व राजकीय वास्तववाद हे दोन प्रमुख दृष्टीकोन आहेत. काही विचारवंतांनी १९२० ते १९३० या काळात प्रभावी असणारा आदर्शवादी दृष्टीकोन मांडला. काही विचारवंतांनी १९३० ते १९५० या काळात प्रभावी असणारा वास्तववादी दृष्टीकोन मांडला. हे दोन पारंपारिक दृष्टिकोन मांडले जातात, तर १९५० नंतर ऐतिहासिक दृष्टिकोन, व्यवस्थात्मक दृष्टिकोन, संसूचन दृष्टिकोन इ. वर्तनवादी दृष्टिकोन मानले जातात. हे दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या कोणत्याही एका पैलुवर प्रकाश टाकतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे संपूर्ण स्वरूप कोणत्याही एका दृष्टीकोनातून स्पष्ट होणे शक्य नाही. या विविध दृष्टिकोनांतील 'आंतरराष्ट्रीय राजकारणातील आदर्शवादी दृष्टीकोन' हा महत्वाचा दृष्टिकोन आहे. तो खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

पहिल्या महायुद्धानंतर १९२० ते १९३० हा आदर्शवादी दृष्टिकोनाचा प्रभाव असलेला कालखंड होय. पहिल्या महायुद्धाने विनाशकारी स्वरूपाची जाणीव सर्व जगाला करून दिली. या युद्धापासून, युद्ध म्हणजे केवळ दोन सैन्यातील लढाई न राहता त्याला सर्वंकष स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे जगात चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्याची गरज निर्माण झाली. पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या पॅरिस शांतता परिषदेमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांनी आंतरराष्ट्रीय संबंधात संबंधात सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी मांडलेली १४ तत्वे व त्यानुसार राष्ट्रसंघाची

स्थापना या घटनांमुळे आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापनेबाबत आशावादी वातावरण निर्माण झाले. आदर्शवादाच्या उदयाची ही पार्श्वभूमी आहे. शांतता प्रस्थापित करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आदर्श व्यवस्था निर्माण करणे शक्य आहे, असे अनेक विचारवंतांना वाटू लागले. त्यातूनच सेंट सायमन, हक्सले, सरेसल, प्रेसिडेंट विल्सन, महात्मा गांधी, मार्गारेट मीड, इ. विचारवंतांनी आदर्शवादी दृष्टिकोन मांडला.

उत्क्रांतीच्या मार्गाने मानवी समाज विकसित व प्रगत होत चालला आहे, असे आदर्शवाद मानतो, हे आदर्शवादाचे आधारभूत तत्व आहे. त्यामुळे शिक्षणाच्या, सुधारणांच्या व आंतरराष्ट्रीय संस्था यांच्या सहाय्याने अधिक चांगली जागतिक व्यवस्था निर्माण करता येईल, अशी त्यांची धारणा आहे. मानवाच्या मुलभूत चांगुलपणावर आदर्शवाद श्रद्धा ठेवतो. त्यामुळे शिक्षण सुधारणांद्वारे आणि क्वचित सक्तीचा वापर करून अनेक नैतिक व बुद्धीप्रामाण्यवादी जागतिक व्यवस्था निर्माण करता येईल असा ~~आदर्शवाद आणि~~ आदर्शवादाचा विश्वास आहे. राजकीय आदर्शवाद आणि राजकीय वास्तववाद या दोन दृष्टीकोनातील मतभेदाचा मुख्य प्रश्न हा सत्तेसंबंधीचा आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात वास्तववादी विचारसरणीचा उदय झाला. पण आदर्शवाद पाठपुरावा करत असलेली मुल्ये आणि वास्तववादाची मुल्ये भिन्न होती. वास्तववाद शास्त्रीय पद्धतीच्या साहाय्याने सत्तेचे मुल्य मांडत होता तर आदर्शवाद तत्वज्ञानावर आधारित नैतिक मुल्यांचा प्रश्न हा मुलभूत प्रश्न असल्याचे आदर्शवाद मानतो. जगात वेगवेगळे हितसंबंध असले तरी या विविध हितसंबंधांमध्ये सुसंवाद निर्माण करणे शक्य आहे. राजकारणात सत्तेसाठी संघर्ष दिसतो. पण सत्तेचे राजकारण हाच काही राजकारणाचा स्वभाव नव्हे. विविध हितसंबंधांमध्ये समन्वय निर्माण केल्यास सत्तासंघर्ष संपुष्टात येऊन निश्चित मुल्यावर आधारित राजकारण शक्य आहे, असे हा दृष्टिकोन मानतो.

१९३० नंतर जागतिक परिस्थिती पुन्हा तणावपूर्ण बनत गेली. राष्ट्रसंघाच्या निर्मितीने सुरुवातीला निर्माण केलेले आशादायी वातावरण बदलले. जगाची वाटचाल दुसऱ्या महायुद्धाच्या दिशेने होऊ लागली, राष्ट्रसंघ परिणामशून्य बनला. या पार्श्वभूमीवर वास्तववादी दृष्टीकोन मान्यता पावू लागला. आदर्शवादाची पिछेहाट झाली. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीने युद्धाच्या स्वरूपात बदल घडून आले. अण्वस्त्रांच्या निर्मितीमुळे शांतता प्रस्थापनेची कधी नव्हे, एवढी गरज निर्माण झाली. शांततेची प्रस्थापना आंतरराष्ट्रीय सहकार्याशिवाय शक्य नाही. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रांत सहकार्य निर्माण होण्याची गरज निर्माण झाली. या परिस्थितीमध्ये आदर्शवादी विचारांना पुन्हा मान्यता मिळाली. मानवी संबंधांमध्ये संघर्ष असतात तसेच सहकार्यही असते हे वास्तववादीही मान्य करू लागलेत, आणि आदर्शवाद व वास्तववाद असा संघर्ष न मानता दोन्ही दृष्टीकोनांच्या समन्वयातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अधिक परिपूर्ण आकलन होऊ शकेल असे क्विन्सी राईट सारख्या विचारवंतांनी सांगितले.

10 वरीलप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या आदर्शवादी दृष्टीकोनाची चर्चा करता येईल.

Date : / /
Page No.:

Date :- 3-02-2021

# Seminar

Name :- Trapti Sachin Somkuwar.

Sub :- Political Science

9/10

Class :- BA. III

Roll No :- 5621

Paper No :- 9

Seminar Topic :-

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आदर्शवादी दृष्टिकोण

प्रस्तावना :-

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास अनेक विचारवंतांनी विविध दृष्टिकोनातुन करुन आंतरराष्ट्रीय भुमिका राजकारणाच्या नवनवीन सिद्धांत मांडले आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपाकडे बघण्याची भुमिका म्हणजे दृष्टिकोन होय.

त्याचबरोबर आपण पहिल्या आंतरराष्ट्रीय राजकरणाविषयी जाणुन घेणे, गरजेचे आहे. कारण यातुनच आदर्शवादी दृष्टिकोनाची कारणे पुढे आलेली आहेत. म्हणुन याला समजुन घेणे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाबाबत राजकीय आदर्शवाद आणि राजकीय वास्तवाद हेच दोन प्रमुख दृष्टिकोन आहेत. काही विचारवंतांनी 1930 ते 1950 या काळात प्रभावी असणारा आदर्शवाद मांडला. हे दोन्ही दृष्टिकोन पारंपारीक मानले जातात. 1950 नंतर उदयास आलेला ऐतिहासिक दृष्टिकोन, व्यवस्थात्मक दृष्टिकोण, संतुलन दृष्टिकोन इत्यादी दृष्टिकोन मानले जातात. आंतरराष्ट्रीय राजकारणाची दृष्टिकोन मधील आदर्शवाद दृष्टिकोण हा महत्वाचा मानला जातो.

★ आदर्शवादी दृष्टिकोण :-

पहिल्या महायुद्धानंतर चे 1920 ते 30 आदर्शवादी दृष्टिकोणाचा प्रभाव असणारा कालखंड होय. पहिल्या महायुद्धाने विनाशकारी स्वरूपाची जाणीव सर्व जगाला करुन दिले. या युद्धापासुन युद्ध म्हणजे केवळ दोन सैन्यातील लढाई न राहता त्याला सर्वकष स्वरूपात प्राप्त झाले. त्यामुळे जगात चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्याची गरज निर्माण झाली. पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या पॅरीस शांतता परीषदमध्ये अमेरीकन अध्यक्ष विल्सन यांनी आंतराष्ट्रीय संबधना सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी मांडलेली 14 तत्वे व त्यानुसार सेंट सायमन इकसने, रसेल, महात्मा गांधी, इत्यादी विचारवंतांनी आदर्शवाद मांडला.

आदर्शवादी दृष्टिकोनाच्या उदयाची पार्श्वभूमी आहे: शांतता प्रस्थापित करणे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आदेश क्षेत्रात व्यवस्था निर्माण करणे. उत्क्रांतीच्या मार्गाने मानवी समाज विकसित व प्रगत होत चाललेला आहे. असे आदर्शवाद मानतो. हि आदर्शवादाचे आधारभूत तत्वे आहेत. मानवाच्या मुलभुत चांगुलपणावर आदर्शवाद विश्वास ठेवतो.

★ 1930 नंतरची जागतिक परीस्थिती :-

1. 1930 नंतर जगातील परीस्थिती पुर्ण तणावपुर्ण बनत गेली.

II. राष्ट्रसंघाच्या निर्मीतीने सुरुवातीला निर्माण केलेल्या आशादायी वातावरण बदलते.

III. जगाची वाटचाल दुसऱ्या महायुद्धाच्या दिशेने होऊ लागली

IV. राष्ट्रसंघ परीणाम शुन्य बनला.

V. या पार्श्वभुमीवर वास्तववादी दृष्टिकोन मान्यता पावु लागला.

VI. आदर्शवादाची पीछेहाट झाली.

VII. पण दुसऱ्या महायुद्धानंतर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीने युद्धांच्या स्वरुपात बदल घडुन आले.

VIII. अण्वस्त्रांची निर्मिती यामुळे शांतता प्रस्थापनेची कधी नव्हती एवढी गरज निर्माण झाली.

IX. शांततेची प्रस्थापना आंतरराष्ट्रीय सहकार्य शिवाय शक्य नाही.

X. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात सहकार्य निर्माण होण्याची गरज निर्माण झाली.

XI. या परिस्थिती मध्ये आदर्शवादी विचारांना पुन्हा मान्यता मिळवली.

* निष्कर्ष :-

I. शांतता प्रस्थापित करुन आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आदर्श व्यवस्था निर्माण शक्य आहे असे विचारवंतांना वाटु लागले होते.

II. विविध हितसंबंधातुन समन्वय निर्माण केल्यास सत्तासंघर्ष संपुष्टात येऊन निश्चितत मुल्यावर आधारीत राजकारण शक्य आहे.